"स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिला नेतृत्वाची भूमिका:
एक चिकित्सक अभ्यास
(विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा परिषद. २००२ ते २०१२)"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विज्ञान विद्याशाखा अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी.

पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक
रुपाली वंसतराव देशमुख
एम.ए.(राज्यशास्त्र), नेट, सेट.

मार्गदर्शक
डॉ. सुखनंदन उत्तमराव ढाले
एम.ए. (राज्यशास्त्र), सेट, पीएच.डी.
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

जुलै २०१९

स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये महिला नेतृत्वाची भूमिका

एक चिकित्सक अभ्यास

(विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा परिषद सन २००२ ते २०१२)

प्रस्तावनाः

२१व्या शतकात लोकशाही शासन व्यवस्था एक आदर्श व्यवस्था मानली जाते.१९४७ ला स्वातंत्र्य प्राप्तिनंतर भारताने लोकशाही शासन व्यवस्थेचा अवलंब केला,लोकशाही शासन व्यवस्थेत अंतिम सत्ता जनतेच्या हातात असते.त्यामुळेच घटनाकारांनी भारतीय समाजात अत्यंत दारिद्रय आणि शिक्षणाचा अभाव, लैगिक भेदभाव असुन सुध्दा जात ,धर्म, वंश, स्त्री - पुरुष असां कुठलाही भेदभाव न करता स्त्री पुरुषांना समान मतदानाचा हक्क दिला.लोकशाही शासनव्यवस्थेच्या माध्यमातुन स्वातंत्र्य,समता,न्याय प्रत्येक वर्गातील स्त्री पुरुषांना देण्यासाठी सत्तेच्या विकेंद्रीकरणाची संस्कृती भारतात रुजवण्यासाठी पंचायत राज व्यवस्थेचा स्विकार केला. आपल्यावर शासन कोण करणार हे ठरवण्याचा अधिकार वयाची १८ वर्ष पुर्ण झालेल्या सर्व व्यक्तीस दिला आहे. लोकशाही शासन व्यवस्था यशस्वी होण्यासाठी सर्व सामान्य जनतेचा सहभाग वाढवणे विविध पातळयांवर आवश्यक आहे. त्यामध्ये त्यांना मतदानाचा अधिकार देणे, घडामोडींची माहीती घेणे, निवडणूकी संबंधी माहीती घेणे, त्यावर चर्चा करणे, पक्षांच्या प्रचारात सहभागी होणे, पक्षांचं सदस्य होणे, सभांमध्ये सहभागी होणे, निवडणूकीला उमेदवारी घेणे, निवडणूक लढविणे, याद्वारे आपला सहभाग नोंदवितात.

भारतीय घटनाकारांनी घटना निर्मीती करताना सामाजिक, शैक्षणिक, आर्थिकदृष्टया मागास व वंचित असलेल्या समाज घटकाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विधायक भेदभावाचे सुत्र स्विकारले.वर्ण,जात,लिंग इत्यादी व्यवस्थेमुळे मागे राहिलेल्या मागासवर्गीयांसाठी लोकप्रतिनिधी गृहे (लोकसभा, विधानसभा) शासकीय नोकऱ्या, शिक्षण क्षेत्रात आरक्षनाची तरतूद केली.वंचित वर्गातील व्यक्तींना निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी घटनेतील अनुच्छेद ३३० (२) नुसार लोकसभेत आणि अनुच्छेद ३३२ (३) नुसार विधानसभेत अनुसूचात जाती (एस.सी.) अनुसूचित जमाती (एस.टी.)यांच्यासाठी त्यांच्या लोकसभेच्या प्रमाणात राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत,याच सुत्रानुसार महिला आरक्षणासाठी चर्चा घटना परिषदेत झाली.

डॉ.आंबेडकरांनी स्त्री सबलकीकरण करण्याच्या दृष्टीने हिंदूकोड बिल संसदेत मांडले,परंतू तत्कालीन सामाजिक मानसिकतेमुळे स्त्री सक्षमीकरण्याच्या प्रयत्नांना विरोध झाला.

भारतीय घटनेत एकीकडे समानसंधी,समानतेचा,स्वातंत्र अधिकारांचा स्विकार करताना दुसऱ्याबाजूस महिलांना संधी समान पातळीवर देण्यास व्यापक स्तरावर मानसिकता होत नव्हती.

जगात आंतरराष्ट्रीय पातळीवर यादृष्टीने ८ मार्च हा दिवस जागतिक महीला दिन म्हणून साजरा केला जातो व याचा उद्देश जागतिक महिलांमध्ये अधिकारांविषयी जागृकता निर्माण होणे आहे.संयुक्त राष्ट्रसंघाच्या या निर्णयामुळे महिलांच्या सक्षमीकरण्याच्या चळवळीला एक व्यापक स्वरुप प्राप्त झाले.आंतरराष्ट्रीय-राष्ट्रीय व्यासपीठावर संधी मिळवण्याच्या खाली अनेक पांढरपेशा महिला या क्षेत्रात उतरल्या परंतु ग्रामीण भागाची माहिती नसणाऱ्या या महिलांनी स्त्री सक्षमीकरणाचे नवीन समीकरण मांडले.या महिलांनी आधी निधी मग चळवळीला प्राधान्य दिले, याचा परिणाम मात्र महिला सक्षमीकरणाऐवजी ती खुंटली.

भारत देशास जगामध्ये संसदेची जननी संबोधतात,तिचाच अविष्कार राज्यपातळीवर विधानसभा, विधानपरिषदेच्या रुपाने पुढे आला.परंतू खऱ्या अर्थाने सत्तेचे विकेंद्रीकरण झाले नाही. सत्तेचे विकेंद्रीकरण झाल्या शिवाय सर्व सामान्य व्यक्तीचा विकास होणार नाही,म्हणुन सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे, विकास योजना तळागळापर्यत पोहचव्यासाठी, सामान्य जनतेचा सहभाग वाढावा यासाठी पंचायत राज व्यवस्थेचा स्विकार केला.स्थानिक राज व्यवस्थेचा उद्वेश्य केवळ महिलाच राजकीय सबलीकरण करणे नसून आर्थिक, सामाजिक पातळीवर त्यांचा विकास करणे हा सुद्धा आहे.

भारतात ६७ टक्के जनता खेडयात राहते, त्यामुळे पुर्वीपासूनच या सर्वसामान्य जनतेचा विकास व्हावा यासाठी पंचायत राजव्यवस्थेचा स्विकार केला पण या स्थानिक संस्थांचे अस्तित्व जात, रुढी, परंपरा या संकुचित आधारस्तंभावर निर्भर होत्या.आधुनिक लोकशाही ब्रिटीश राजवटीत उदयास आली.लॉर्ड रिपनच्या प्रयत्नांमुळे स्थानिक स्वराज्य संस्थेचा पाया घातला गेला,म्हणुन लॉर्ड रिपनला स्थानिक स्वराज्य संस्थेचा जनक म्हणतात.ब्रिटीशांनी केलेल्या कायदयामुळे सुद्धा १९१९ व १९३५ स्थानिक स्वराज्य संस्थांना चालना मिळाली.

१९४७ ला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकशाही विकेंद्रीकरणाचे तत्व स्विकारण्यात आले.सातव्या परिशिष्ठात स्थानिक स्वराज्य संस्थेचा अंतर्भाव केला.स्थानिक स्वराज्य संस्था हा विषय राज्य सूचितील विषय आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नियोजनबद्ध विकासाच्या दृष्टीने पहिली पंचवार्षिक योजना (१९५१-१९५६) अमलात आणली, खेडयांना स्वावलंबी बनवण्यासाठी सामुहिक विकास योजना (१९५२) व राष्ट्रीय विस्तार सेवा प्रकल्प (१९५३) या योजना शासनाद्वारे राबवण्यात आल्या. अशा यंत्रनेच्या माध्यमातुन ग्रामीण जनतेच्या आर्थिक परिस्थीतीत परिवर्तन घडवुन आणने हा हेतू होता,त्यामध्ये जनतेचा सहभाग नव्हता,त्यामुळे १९५७ बलवंतराय मेहता समितीची स्थापना करण्यात आली. मेहता समीतीने सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने शिफारशी केल्या,या समितीच्या शिफारशीनुसार १९५९ साली देशात पंचायतराज व्यवस्था प्रत्यक्षात आली. पंचायतराज व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी व त्यात सुधारणा सुचविण्यासाठी राष्ट्रीय-महाराष्ट्राच्या स्थरावर वेगवेगळया समित्यांची स्थापना करुन पंचायतराज व्यवस्था अधिक लोकभिमुख करण्याचा प्रयत्न झाले.प्रत्यक्षात मात्र पंचायतराज संस्थांचे अस्तित्व राज्यशासनाच्या मर्जीवर अवलंबून होते त्यांना राजकीय अधिकार-स्वायत्तता कमी होती. आर्थिक बाबीसाठी त्यांना राज्यसरकारवर अवलंबून असल्यामुळे राजकीय, आर्थिक परावलंबत्व त्यांच्यात आले होते, त्यामुळे या संस्थांना कार्यक्षम बनवण्यासाठी पंचायतराज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा बहाल करण्याची भूमिका अभ्यास समिती विचारवंतीनी वेळोवेळी मांडली.

या पार्श्वभूमीवर तत्कालीन पंतप्रधान श्री.राजीव गांधी यांनी १५ मे १९८९ रोजी लोकसभेत मांडलेले पंचायतराजच्या संदर्भात ६४ व्या घटनादुरुस्तीचे विधेयक १० ऑगष्टट १९९० रोजी लोकसभेत पारित झाले, पण राज्यसभेत नामंजूर झाल्यामुळे संविधान दुरुस्ती होऊ शकली नाही. त्यानंतर १९९१ मधे पी.व्ही.नरसिंहराव यांचे सरकार सत्तेवर झाल्यानंतर पंचायतराज संस्थांबाबत हेच विधेयक ७३ व्या घटनादुरूस्तीच्या रुपाने १६ सप्टेंबर १९९१ रोजी लोकसभेसमोर सादर केले.२२ डिसेंबर १९९२ रोजी जवळजवळ एकमताने ७३ वी घटनादुरुस्तीचे विधेयक लोकसभेत मंजूर झाले.राज्यसभेने २३ डिसेंबर १९९२ रोजी मंजूरी

दिली.१७ घटकराज्यांच्या विधीमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर २० एप्रिल १९९३ रोजी राष्ट्रपतीची यावर स्वाक्षरी झाली आणि २४ एप्रिल १९९३ पासूनहा कायदा संपूर्ण भारतभर लागू करण्यात आला.

पंचायतराज संस्थाचे विकेंद्रीकरण व्हावयाचे असेल आणि या संस्था लोकभिमुख व्हावयाच्या असतील तर यात स्त्रियांचा सहभाग वाढविणे आवश्यक होते.यासाठी ७३वी घटनादुरूस्ती महत्वाची ठरते.७३ व्या घटनादुरूस्तीनुसार कलम २४३(ब) मध्ये प्रत्येक पंचायतीमध्ये थेट निवडणूकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकुण संस्थेच्या एकतृतीयांश पेक्षा कमी नसतील एवढया जागा महिलांसाठी राखुन ठेवण्यात येतील आणि पंचायतीमधील विविध मतदारसंघामध्ये आळीपाळीने अशा जागांचे वाटप करण्यात येईल. अशा प्रकारची तरतूद करण्यात आली आहे.३३% जागा आरक्षित ठेवल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांचा सहभाग वाढला. ७३ व्या घटनादुरूस्तीत पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा देऊन भारतात तळागळापर्यत सत्तेच्या विकेंद्रीकरणास सुरुवात केली आणी त्यामध्ये आणखी भर म्हणून आरक्षणाचा समावेश करण्यात आला, जेणे करुन सत्तेपासून समाजातील कोणताही घटक वंचीत राहणार नाही याची काळजी घेतली.

भारतात १९९३ पासून स्विकारलेल्या ७३-७४ व्या घटनादुरूस्तीने पंचायतराज संस्थात महिलांना प्रतिनिधीत्व करण्याचा अधिकार मिळाला.पंचायतराज व्यवस्थेत महिलांना ३३% आरक्षण देण्यात आले तर महाराष्ट्र राज्या सारख्या पुरोगामी राज्याने महिलांसाठी ५०% आरक्षणाची तरतूद केली. महिलांना पंचायतीराज मधील आरक्षण हे महिला सक्षमीकरणासाठी महत्वाचे पाऊल ठरले.या पार्श्वभूमीवर पंचायतीराज व्यवस्थेतील महिलांचा सहभाग व नेतृत्वाला महत्व प्राप्त झाले आहे. ७३व्या घटनादुरूस्तीत महिला आरक्षणामुळे विकसीत झ ालेले महिला नेतृत्च, स्थानिक पातळीवर महिलांच्या सहभागा समोरील आव्हाने, महिला नेतृत्वाची क्रियाशिलता, महिला नेतृत्वाच्या मर्यादा, महिला नेतृत्वासमोरील समस्या, व्यवस्थेत झालेल्या गुणात्मक बदल समजून घेणे अभ्यासकांच्या दृष्टीने औत्सुक्याचे ठरले म्हणून ७३व्या घटनादुरूस्ती व महिला नेतृत्वाचा अभ्यास करण्यासाठी पंचायतीराज व्यवस्थेतील महत्वाची कडी असलेल्या जिल्हा परिषदेतील महिला नेतृत्वाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न संशोधकाने

केला आहे.अभ्यासाच्या सोयीसाठी महिला नेतृत्वाचा अभ्यास करताना हिंगोली जिल्हा परिषदेतील महिला नेतृत्वाच्या विश्लेषणावर सदर संशोधनात भर देण्यात आला आहे.

महिला नेतृत्वाची स्थानिक स्वराज्य संस्थेमधील वस्तुस्थिती:

महिला नेतृत्वाची स्थानिक स्वराज्य संस्थेमधील वस्तुस्थितीचा परामर्श घेता ही बाब स्पष्ट होते की, महिला समाजाचा महत्वाचा घटक आहेत.त्यांनाही विकासाची समान संधी मिळाली पाहिजे, ही समाजाची आशी मानसिकता बनणार नाही तो पर्यंत आरक्षण ही तात्पुरती मलमपट्टी ठरेल. दिर्घकालीन महिलांच्या विकासाचे ते साधन ठरणार नाही म्हणून सर्वांगीण विकासासाठी पुरुषी मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

महिलांना आरक्षण मिळून जवळपास पाव शतक झाले आहे.आज बराच काळ उलटून गेला तरी म्हणावा तसा परिस्थितीत बदल झाला नाही. आजही विविध पदावर निर्वाचित महिला संविधानाने दिलेल्या अधिकारांचा स्वतंत्रपणे वापर करू शकत नाहीत. आजही त्या पुरूषांच्या मर्जीप्रमाणेच वागतात याचे कारण म्हणजे महिलांचा अशिक्षितपणा, निष्क्रीयता आणी पुरूष प्रधान संस्कृतीचा प्रभाव, आश्या विविध स्थीतींमूळे महिला प्रतिनिधींना स्वतंत्र्यपणे कार्य करण्याची संधी दिली जात नाही, त्यांच्यावर समाजाचे, परिवाराचे, पुरूषवर्गाचे बंधन आहे आशी जानीव होते.

स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिलांच्या प्रभावी प्रतिनिधीत्वासाठी त्यांचे सबलीकण होणे आवश्यक आहे,त्यासाठी राजकीय जागृकता व प्रशिक्षणाची गरज आहे.त्याचबरोबर स्त्री व पुरूषांची सामाजिक-मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

संशोधन विषयाचे महत्वः-

प्रस्तूत संशोधनासाठी निवडलेला विषय स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला नेतृत्वाची भूमिका-विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा परिषद २००० ते २०१२ हा आहे.हिंगोली जिल्हातील स्थानिक स्वराज्य संस्थेत विशेषत: जिल्हा परिषदेत महिला नेतृत्वास संधी मिळाली आहे, त्यामुळे त्यांच्या सामाजिक जीवनात व आर्थिक परिस्थीत बदल घडून आले आहेत.या

बदलांचा व महिला सक्षमीकरणाचा अभ्यास करण्यासाठी आणि महिला सक्षमीकरणाचे विविध पैलू जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्वपूर्ण ठरणार आहे.जिल्हयातील महिला चळवळ, महिला प्रतिनित्व व नेतृत्वाच्या अभ्यास करण्या साठी प्रस्तुत विषयाचे महत्व असणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

१) हिंगोली जिल्हा परिषदेमधील महिलांच्या सहभागाचा अभ्यास करणे.

२) जिल्हा परिषदेतील नेतृत्व केलेल्या महिला सदस्यांच्या नेतृत्व विकासातील समस्या जाणून घेणे.

३) महिला नेतृत्वाची सामाजिक, आर्थिक विकासातील भूमीका अभ्यासणे.

४) हिंगोली जिल्हा परिषदेमधील महिला प्रतिनिधीच्या कामकाजाचा अभ्यास करणे.

५) ७३व्या घटनादुरूस्ती झाल्यानंतर महिला आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेत झालेल्या संरचनात्मक आणि वर्तनात्मक अभ्यास करणे.

गृहितके:

१) हिंगोली जिल्हा परिषदेमधील महिला सदस्यांचा त्यांच्या कार्यकाळ समाप्तीनंतर राजकारणतील सहभाग उदासीन राहीला आहे.

२) पार्श्वभूमी असलेल्या महिलांनाच राजकारणात अधिक संधी आहेत.

३) जिल्हा परिषदेतील महिला नेतृत्वासमोर कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणीक समस्या व प्रशिक्षण नसणे ईत्यादी समस्या आहेत.

४) हिंगोली जिल्हा परिषदेमधील मागासवर्गीय महिला नेतृत्वाचा सक्रिय सहभाग राहीला आहे.

५) जिल्हा परिषदेमध्ये प्रतिनिधीत्व केलेल्या महिला प्रतिनिधीमधुन जिल्हास्तरीय नेतृत्व विकसीत झाले नाही.

६) महिलांच्या सहभागामुळे पंचायतराज व्यवस्थेला अधिक बळकटी प्राप्त झाली आहे.

७) हिंगोली जिल्हा परिषदेमधील महिला नेतृत्वाला मोठया प्रमाणावर प्रभाव निर्माण करता आला नाही.

संशोधन समस्याः

प्रस्तूत संशोधणासाठी निवडयात आलेल्या " स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये महिला नेतृत्वाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा परिषद २००० ते २०१२)" या संशोधण विषयाला अनुसरुन पुढील संशोधन समस्या सुत्रबद्ध करण्यात आल्या आहेत.

१) स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सत्तापदे-अधिकारपदे सांभाळण्यासाठी महिला पुढे येत असल्यातरी त्यापैकी किती महिला स्वयंप्रकाशीत आहेत किंवा स्वकर्तृत्वावर सामाजिक-जीवनात उतरल्या आहेत त्याचा शोध घेणे आवश्यक आहे.

२) स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कामकाजात मनापासून भाग घेण्याची मानसिक तयारी महिला सदस्यांची आहे का ? केवळ संधी मिळाली म्हणून त्या ठिकाणी जायचे अशीच त्यांची भूमीका आहे.

३) आरक्षणातून महिलांना मिळालेल्या संधीचा व अधिकारांचा उपयोग त्यांच्याकडून होतो का?

४) महिला सबलीकरणाला आरक्षणातून चालना मिळाली असली तरी प्रत्यक्षात महिलांचे सबलीकरण झाले का?

५) नविन महिला सदस्यांसाठी प्रशिक्षणाची व्यवस्था केली जाते का ?

६) महिला सदस्यांना त्यांच्या कामकाजात पुरुषांचे योग्य सहकार्य मिळते का ?

वरिल सर्व समस्यांचा अभ्यास करता सर्व समस्या हया स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला नेतृत्वाच्या संदर्भाने दिसून येतात. या विषयाची सखोल माहिती प्राप्त करण्यासाठी संशोधकाणे " **स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला नेतृत्वाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा परिषद २००२ ते २०१२)**" हा विषय संशोधनाच्या आभ्यासासाठी निवडला आहे.

संशोधन विषयाचे व्याप्ती / अभ्यासक्षेत्र :

"स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला नेतृत्वाची भूमिका " विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा परिषद २००२ ते २०१२ हा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे. हिंगोली जिल्हा हा नवनिर्मित जिल्हा

आहे. हिंगोली जिल्हातील जिल्हा परिषदेतील महिला प्रतिनिधींच नेतृत्व हा अभ्सासाचा केंद्रबिंदू आहे .त्यामुळे (महिला करिता) आरक्षित प्रभागातुन व विभाग (जिल्हा परिषद सर्कल) मधून निवडून आलेल्या महिलांच्या विकासाचा नमुना पध्दतीने सन २००२ ते २०१२ या कालखंडाचा अभ्यास केला जाणार आहे.

संशोधन पध्दती :

"स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला नेतृत्वाची भूमिका "विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा परिषद २००२ ते २०१२ हा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे.प्रस्तुत विषयाचे संशोधन करीत असताना सामाजिक शास्त्रातील सर्वेक्षणात्मक पध्दतीचा अवलंब केला जाणार आहे .त्यासाठी सहेतूक नमूना निवड करून तथ्याचे संकलन व विश्लेषण करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन :

संशोधनाची यशस्वीता पूर्णपणे तथ्यांवर अवलंबून आहे.संशोधन विषयाशी संबंधीत घटनांचे अध्ययन करून त्या घटनासंबंधीत तथ्यांचे संकलन केले जाते आणि तथ्यांच्या आधारे संशोधनाचे निष्कर्ष मांडले जातात.म्हणून तथ्याचे संकलन शास्त्रीय पध्दतीने करणे आवश्यक आहे .प्रस्तुत संशोधन विषयासाठी संशोधकाने दोन प्रकारे तथ्याचे संकलन केले आहे. जेणे करून संशोधनामध्ये अचुकता येईल.प्रस्तावीत संशोधनासाठी प्राथमीक व दुय्यम स्त्रोतांचा उपयोग होणार आहे.या स्त्रोतांच्या साहयाने संकलीत केलेल्या तथ्यांचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन :

१) प्राथमिक स्त्रोत -

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने प्राथमिक तथ्यांच्या संकलनासाठी मुलाखत अनुसुची या निरीक्षण या तंत्राचा अवलंब केला आहे.

२) दुय्यम स्त्रोत -

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने दुय्यम तथ्य संकलनासाठी विविध ग्रंथालयामधे असणारे संदर्भ ग्रंथ , ज्ञानकोश ,शासकीय अहवाल,दैनंदिनी याचा वापर केला आहे . सोबतच मासिके ,

त्रैमासिके , वार्षिक अहवाल , दैनंदिन वर्तमान पत्र यांचाही वापर केला आहे.दुय्यम तथ्यांच्या संकलनासाठी इंटरनेटचाही वापर संशोधकाने मोठया प्रमाणावर केला आहे.

प्रकरणाची रुपरेषा :-

प्रस्तुत संशोधनात तथ्यांचे विश्लेषण करुन त्याच्या वर्गीकरणासाठी प्रकरण निहाय संशोधन आराखडा तयार केला आहे .संशोधन उद्‌िष्टांच्या आधारे शोध प्रबंधाची मांडनी एकुन सहा प्रकरणात केली आहे.

१) प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रास्ताविक स्वरूपात स्थानिक स्वराज्य संस्थेच महत्व, लोकशाहीच्या विकेंद्रीकरणासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका या संबंधी मांडणी केली आहे. तसेच महिलांच्या विकासासाठी सहभागाचे महत्व , ७३ वी घटनादुरुस्ती , महिला आरक्षण याचा महिला नेतृत्वावर झालेला परिणाम या विषयी उहापोह केला आहे .प्रस्तुत अभ्यासविषय निवडी मागची भूमीका , संशोधन समस्या , अभ्यास विषयाचे महत्व व व्याप्ती , अभ्यासाच्या मर्यादा , संशोधनाची उदिृष्ट, गृहितक , अध्ययन पध्दती , तथ्य संकलन , या घटकांचे विवेचन करण्यात येणार आहे.

२) हिंगोली जिल्हाचे परिचयात्मक अध्ययन -

प्रस्तुत अभ्यास हिंगोली जिल्हा परिषदेच्या विशेष संदर्भात असल्यामुळे सदर प्रकरणात हिंगोली जिल्हाची निर्मिती , जिल्हाचा सर्वागीण विकास , सांस्कृतिक वैभव, भौगोलिक परिस्थिती , जिल्हातील उपविभाग , तालूके तसेच जलसिंचन , उदयोगधंदे , दळणवळण व्यवस्था याचा आढावा घेतला आहे.तसेच हिंगोली जिल्हातील समाज जीवन , शैक्षणिक स्थिती , साक्षरतेचे प्रमाण ,जात , धर्म , व्यवसाय या अनुषंगाने सामाजिक परिस्थितीचे विवेचन केलेआहे.हिंगोली जिल्हाच्या विकासाचा आढावा घेताना निजामकालीन राजकारण, हिंगोली जिल्हातील पक्षीय, निवडणूका या अनुषंगाने मांडणी केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महत्वपूर्ण कडी असलेल्या जिल्हा परिषदेची रचना, कामकाज पध्दती,कार्य या संदर्भाने जिल्हा परिषदेचे संघटन मांडले आहे.

३) स्थानिक स्वराज्य संस्थांच महत्व -

प्रस्तुत प्रकरणामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचा अर्थ , इतिहास , विकास, घटनात्मक दर्जा, ७३-७४ वी घटनादुरुस्ती , महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था , आरक्षण, महिलांचा सहभाग , हिंगोली जिल्हातील स्थानिक स्वराज्य संस्था, महिला प्रतिनिधीत्व , नेतृत्व व सहभाग इत्यादी अभ्यास केला आहे.

४) हिंगोली जिल्हा परिषदेतील महिला नेतृत्व -

७३व्या घटनादुरुस्तीनंतर पूर्ण देशाप्रमाणेच महाराष्ट्रातही पर्यायाने हिंगोली जिल्हातील महिलांचा सहभाग वाढला.पुर्वी फक्त वारसा असलेल्या घरातील स्त्रियांनाच संधी मिळायची ती आता संपुर्ण जाती-धर्मातील महिलांना मिळु लागली आहे.परंतु नेतृत्व करत असताना त्यांना कोणत्या प्रकारच्या अडचनी येतात? त्यांच्या कामाचा अनुभव कसा आहे ?काम करत असताना पुरुषांचे सहकार्य मिळाले का?त्यांचे हक्क, अधिकार ,कर्तव्य याबाबत त्या जागरुक आहेत का ? कार्य करण्यासाठी त्यांना विशेष प्रशिक्षण मिळालेआहे का ? पदाधिकारी म्हणून त्यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन बदलतो का ?अशा प्रश्नांच्या उत्तरांसाठी महिला सदस्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन तथ्य संकलनातून आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

५)निष्कर्ष - शिफारशी

प्रस्तुत प्रबंधातील शेवटचे प्रकरण हे निष्कर्ष व शिफारशींचे असून या प्रकरणामध्ये संशोधकाने मांडलेले गृहितके आणि संशोधनाअंती प्राप्त झालेली तथ्ये यांची पडताळनी केली आहे. निवडलेल्या विषयाचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करुन केलेल्या अभ्यासाचे निष्कर्ष मांडले जाणार आहेत.तसेच महिला आरक्षणाच्या उदिृष्ट पुर्तीमध्ये येत असलेल्या अडचनींवर मात करण्यासाठी काही शिफारशी सुचविल्या जाणार आहेत.

संदर्भ सुची

१) पोले कांतराव, महाराष्ट्रातील पंचायत राज व आरक्षण, अरुणा प्रकाशन, लातुर.

२) डॉ. आगलावे प्रदिप, सामाजीक संशोधन पध्दती शास्त्र, विद्य प्रकाशन, नागपुर.

३) डॉ. भांडारकर पु.ल., सामाजीक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंध निर्मीती, नागपुर.

४) डॉ. कऱ्हाडे बी.एम., शास्त्रीय संशोधन पध्दती, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स,नागपुर. जाने.२००७

५) Mandal Amol, Women in Panchayatraj institution, Kaniksha Publishers, New Delhi.

ठिकाण -

दिनांक -

मार्गदर्शक

डॉ.सुखनंदन उत्तमराव ढाले

राज्यशास्त्र विभाग प्रमुख,

शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

संशोधक

रुपाली वंसतराव देशमुख

एम.ए.(राज्यशास्त्र), नेट, सेट